## प्रेसनोट दि.१८/०९/२०१८

# सामाजिक सुरक्षा विभागाकडुन छापा टाकुन एक उजबेकीस्तान व एक भारतीय सज्ञान मुलीची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन १ महिला व पुरुष आरोपीस अटक

दि.१८/९/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना पोलीस हवालदार नरेश बलसाने यांचे कडुन माहीती मिळाली की, सचिन साठे व महिला शाबनाझ मिना हे परदेशी व भारतीय मुलींचे कडुन लष्कर भागामध्ये एका फ्लॅट मध्ये त्यांचेकडुन वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे व विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच लष्कर पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.शिंदे यांनी संयुक्त कारवाई करुन स्टर्लींग हाऊस, कॉनवेंट स्ट्रीट, लष्कर कँप पुणे या ठिकाणी दुसरा मजला, फलॅट नंबर २०१ वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान १ उजबेकीस्तान देशाची व १ भारतीय अशा एकुण २ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा १) सचिन साठे, पुर्ण नाव पत्ता माहित नाही, २.) शाबनाझ अल्ताफ मिना वय २९ वर्षे रा. व्हिस्टेरीया पार्क, ए ३०४, धायरी पुणे मुळगाव दाऊदखान रोड, गल्ली नंबर २०८ मोहशुर जि म्हैसुर कर्नाटक राज्य , ३.) सुरेश लक्ष्मण राठोड वय ३६ वर्षे रा. नेहरु नगर, ता कंधार जि नांदेड याचे विरुध्द लष्कर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १९०/२०१८ इटपा ॲक्ट कलम ३,४,५.७ सह भादंवि कलम ३७०, ३७० अ,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी २.) शाबनाझ अल्ताफ मिना वय २९ वर्षे रा. व्हिस्टेरीया पार्क, ए ३०४, धायरी पुणे मुळगाव दाऊदखान रोड, गल्ली नंबर २०८ मोहशुर जि म्हैसुर कर्नाटक राज्य , ३.) सुरेश लक्ष्मण राठोड वय ३६ वर्षे रा. नेहरु नगर, ता कंधार जि नांदेड यांना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ४०००/- रुपये, २ मोबाईल फोन, पिडीत परदेशी मुलीचा पासपोर्ट व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, पोउनि आनंत व्यवहारे, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, नामदेव शेलार, राजाराम घोगरे, कविता नलावडे, गीतांजली जाधव, सुनिल नाईक, सचिन शिंदे यांनी व लष्कर पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.दिगंबर शिंदे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.